ePaper
अमोल कोल्हे शरद पवारांची भेट घेत खासदारकीचा राजीनामा देणार

वर्ष - 7 । अंक -65 | UDYAM-MH-26-0158827



महाईन्यूज (TM)
लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!

### आतील पानांत


- मावळात नवा गडी; नवं राज्य?!
- पालखी सोहळ्यानिमित्त पुढील ३ दिवस वाहतुकीत बदल
- 'सीएमई' हद्दीतील सांडपाणी प्रकल्पाला संरक्षण विभागाचा 'हिरवा कंदील'!


www.mahaenews.com | मंगळवार, दिनांक 4 जुलै 2023 | पिंपरी-चिंचवड आवृत्ती | mahaenews.com | maha_enews | Mahaenews

# बाकीची वेळ यायचीय!

## फडणवीसांनी 29 जूनलाच संकेत दिलेले; 'चाणक्य'वर वक्तव्य

### भाजपाची मते कमी होणार नाहीत. आम्हाला त्याची चिंता नाही : फडणवीस

।मुंबई । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**केसीआर एकमेकांच्या एबीसीडीचे चट्टेबट्टे आहेत. कोणी नवीन सुरुवात करतो त्याला आमच्यासोबत जोडले जाते. केसीआर आणि आमच्यात फरक हा आहे, त्यांच्या राज्यात बंडी संजय यांच्या नेतृत्वा आंदोलन करत होती. मी देखील अनेकदा गेलो. दोन वेळा माझ्या सभेला परवानगी देण्यात आली नव्हती. केसीआर इकडे आले तेव्हा आम्ही त्यांना आमच्याकडे लोकशाही आहे. नियमानुसार परवानगी घ्यावी, जेवढ्या सभा करायच्या आहेत करा. यामुळे भाजपाची मते कमी होणार नाहीत. आम्हाला त्याची चिंता नाही, असे केसीआर यांच्या व विरोधकांच्या आरोपांवर फडणवीस यांनी उत्तर दिले.**



> मी उपमुख्यमंत्री असलो म्हणून काही फरक पडत नाही. लोकसभेला राज्यातून ४२ पेक्षा कमी जागा जिंकणार नाही. मोदींना लोकांनी निवडले आहे, मला महाराष्ट्रात रहायचे आहे. मी ज्या विचारातून आलोय तिथे मोठे लोक निर्णय घेतात. त्यांनी कुठे सांगितले तिथे करेन, निर्णय त्यांना घ्यायचा आहे, मी खूप छोटा आहे, मी चाणक्य वगैरे नाहीय -
> – **देवेंद्र फडणवीस,** उपमुख्यमंत्री

समुद्रात वाहून जाणारे पाणी आम्ही गोदावरी पात्रात आणणार आहोत. यासाठी सात वर्षे लागतील. मुंबईची परिस्थिती वेगळी आहे. पावसात पाणी तुंबते. ते पाणी पंप करून बाहेर सोडावे लागणार आहे. ते काम गेली २० वर्षे होतच आहे. आम्ही ते अडीच वर्षात पूर्ण करू. रोजगार आणि तरुणांची लग्ने या गोष्टी आरोप करण्यासाठी बोलल्या जातात. चढ उतार येतात, जग महागाईने त्रस्त आहे. परंतू आमचा देश त्यावर नियंत्रण मिळवू शकला आहे. मी असे म्हणत नाहीय की स्वस्त झालेय. मोदींनी युरियावरील सबसिडी दिली आहे. युक्रेन युद्धामुळे युरियाचे दर तिप्पट वाढले आहेत, असे फडणवीस म्हणाले. परंतू, जर माझ्यासोबत कोणी चुकीचा वागला तर लक्षात ठेवून माझी वेळ यायची वाट पाहतो. काही गोष्टी मी सांगितल्या. अन्य गोष्टींची वेळ यायची आहे, असा इशारा फडणवीस यांनी दिला होता. आम्हाला नकार दिल्यानंतर पवार मोदींना भेटायला गेलेले. तिथे त्यांनी पक्षातील काही लोक तयार नव्हते, आम्हाला तुमच्यासोबत यायचे होते, असे कारण दिलेले असे मला समजले होते, असा २०१९ च्या पहाटेच्या शपथविधीवर आणखी एक खुलासा फडणवीसांनी केला.

महाराष्ट्राच्या राजकारणात एकदा, दोनदा नाही तर तिसऱ्यांदा राजकीय भूकंप आणणारे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी एएनआयला स्फोटक मुलाखत दिली आहे. यामध्ये फडणवीसांनी उद्धव ठाकरेंबाबत खुलासे, शरद पवार यांच्याबाबत मत व्यक्त केले आहे. स्मिता प्रकाश ग्रांनी फडणवीस यांची मुलाखत घेतली आहे. यामध्ये चार दिवस आधीच राष्ट्रवादी भाजपसोबत येण्याचा कारण दिसत नाही, असे फडणवीस म्हणाले आहेत. पारिवारीक पक्षांमध्ये आपला उत्तराधिकारी निवडला जातो. शरद पवारांनी इथे सुप्रिया सुळेंना निवडले आहे. राजकारणाला जाणणारे म्हणून त्यांना ओळखले जाते. शरद पवारांना जर मागच्या सीटवर जायचे असते तर त्यांनी सुळेंना अध्यक्ष बनविले असते. राज्याचा बनविला असता, प्रफुल्ल पटेलांनाही बनविले आहे. त्यांनी नेतृत्व हस्तांतर करण्याची प्रक्रिया सुरु केली आहे. ड्रायव्हिंग सीटवर पवारच आहेत, विरोधकांना एकत्र आणण्यात पवारच आहेत आणि जे एकमेकांची तोंडं पाहू शकत नाहीत त्यांनाही समोरासमोर आणण्याची हिंमत पवार साहेबांमध्ये आहे, अशा शब्दांत फडणवीस यांनी पवारांचे राजकारण कसे असते ते सांगितले. राष्ट्रवादी विरोधकांना एकत्र आणण्याचा प्रयोग सोडून तुमच्यासोबत आली तर असा सवाल स्मिता प्रकाश यांनी केला. यावर फडणवीस यांनी का येणार, काही कारण दिसत नाही. राष्ट्रवादी ही शरद पवारांची मालकी आहे. त्यांनी त्यांचे मन बनविले आहे की विरोधकांसोबत जावे, असे फडणवीस म्हणाले.

कोणा राजकारण्याचा मुलगा किंवा मुलगी राजकारणी व्हावा यास आमचा विरोध नाहीय. परंतू, राजकारण्याचा मुलगा आहे म्हणून तो वरच्या पदावर जावा, त्याच्यात नेतृत्व गुण नसले, समजूतदारपणा नसला तरी त्याला हे सर्व मिळावे याला आमचा विरोध आहे.

### गडकरींसोबत कसे संबंध?

गडकरींसोबत तुमचे संबंध कसे आहेत, लोक म्हणतात की एकाच म्यानमध्ये दोन तलवारी असू शकत नाहीत. या प्रश्नावर त्यांची म्यान वेगळी आहे, माझी वेगळी आहे, असे फडणवीस म्हणाले. नागपुरचा विकास हे दोघांचे काम आहे. एका पक्षाचे, एकाच शहरातील नेते समन्वयाने काम करतात हे लोकांना विश्वासच बसत नाही. नागपूर पालिकेची तिकिटे वाटण्यासाठी मी आणि गडकरी बसलो होतो. तेव्हा काही तासांनी मी गडकरींना म्हटले की, मी निघतो मला मुंबई, पुण्याची तिकटेही वाटायची आहेत. गडकरींनी रात्री मला फोन केला दोन चार जागांवर मला ठीक वाटत नाहीय. तुझे मत काय असे ते म्हणाले होते, असा एक किस्सा फडणवीसांनी सांगितला.

### मुंबई पालिका निवडणूक आम्ही नाही, ठाकरेंच्या पक्षानेच अडवलीय; फडणवीस

कोरोना काळात जम्बो कोविड सेंटर घोटाळा, ३५ डॉक्टरांना मेल केला जातो, त्यांना कधीच सेवेत घेतले नाही. त्यांना पगार जात होता. याची चौकशी केलीच पाहिजे, असे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले.

पोलीस अधिकारी लोकांची सेवा करतात असे समजले जात होते. परंतू ते राजकारण्याची सेवा करतात असे प्रकाश म्हणाल्या. यावर फडणवीसांनी मी कधीही पोलिसांचा वापर केला नाही. मी कोणारा लक्ष्य करत नाही. परंतू, जर कोर्टाने सांगितले की तुम्ही याची चौकशी करा, तक्रारी येतील, पुरावे येतील तिथे मला करावेच लागणार आहे. कोरोना काळात जम्बो कोविड सेंटर घोटाळा, ३५ डॉक्टरांना मेल केला जातो, त्यांना कधीच सेवेत घेतले नाही. त्यांना पगार जात होता. याची चौकशी केलीच पाहिजे, असे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले. यावर या चौकशा सीबीआय, ईडी आदींकडे जातात पण कोणी सापडत नाही, असा सवाल प्रकाश यांनी केला. यावर आपली सिस्टिम वेळखाऊ आहे. सरकार कोर्टाला हे ठरवावे लागणार आहे. सर्वोच्च न्यायालयाने लोकप्रतिनिधींवर एका जजने खटला चालवावा, एका वर्षात निकाल लावावा, पण ते पाळले जात नाहीय. लालूंचा चारा घोटाळा किती वर्षांनी निकाल आला, असे फडणवीस म्हणाले. बीएमसी निवडणूक कधी होणार, खूप उशिर केला आहे, असा सवाल प्रकाश यांनी केला. यावर फडणवीस यांनी आम्हालाही लवकर निवडणुका हव्या आहेत. उद्धव ठाकरेंच्या पक्षाने अनेक याचिका दाखल केल्या आहेत. यात आरक्षणाचीही आहे. कोर्टाने या सर्व याचिका एकत्र केल्या आहेत आणि एक स्टेटस को दिला आहे. यामुळे निवडणुका होऊ शकत नाहीएत. जेव्हा कोर्ट ते हटवेल तेव्हा या निवडणुका होतील. हास्यास्पद असे की उद्धव ठाकरे आम्हालाच विचारत आहेत. तुम्हीच याचिका दाखल केल्यात तर तुम्हीच काढून घ्या, दुटप्पीपणा कशाला करताय, असा सवाल फडणवीस यांनी केला.

# सिंहगडावर मान्सून पर्यटनाचा 'पूर'!

## »15 हजारापेक्षा जास्त पर्यटक डेरेदाखल; वनविभागाचा गडावर चोख बंदोबस्त

। बारामती। महाईन्यूज । प्रतिनिधी।

**पुण्यातील सिंहगडावर पर्यटकांच्या गर्दीचा मान्सून बहार झालेला आहे. गेल्या आठवड्यापासून सिंहगड धुक्यात हरविल्याचे वृत्त कळताच पंधरा हजारांहून अधिक जणांनी हजेरी लावली. त्यामुळे वनविभागाने गडावर चोख बंदोबस्त केला आहे.**



पर्यटकांचे वर्षासहलीसाठी हक्काचे ठिकाण असणारा सिंहगड आठवड्यापासून धुक्यात हरविल्याचे वृत्त कळताच रविवारी भल्या पहाटेपासून पुणेकरांनी गडाकडे कूच केले आणि एकाच दिवसांत पंधरा हजारांहून अधिक जणांनी हजेरी लावली. हीच परिस्थिती खडकवासला, पानशेत, लोणावळा अन् ताम्हिणी परिसरातही दिसून आली. पावसाळी पर्यटनाचा आनंद घेण्यासाठी गड-किल्ले, घाट वाटा आणि नुकत्याच खळाळू लागलेल्या धबधब्यांच्या परिसरात दिवसभर पर्यटकांचा राबता होता.

पर्यटकांची गर्दी वाढणार असल्याचे गृहित धरूनच वन विभाग, स्थानिक संयुक्त वन व्यवस्थापन समिती, ग्रामीण पोलिसांनी बहुतांश पर्यटनस्थळांच्या आवारात सकाळपासूनच मोठा बंदोबस्त तैनात केला होता. काही ठिकाणी पर्यटकांच्या तोबा गर्दीने व्यवस्थापनाला ऐन पावसात घाम फुटला. आठवडाभर पडलेल्या पावसामुळे पुण्यालगतच्या निसर्गरम्य ठिकाणांचे फोटो सध्या समाजमाध्यमांत फिरत आहेत. त्यामुळे रविवारी सकाळीच पुणेकरांच्या गाड्या शहराबाहेर पडल्या. एकामागून एक चुकांनी बुडाले साम्राज्य, संपत्ती 'शून्य' तरी अनिल अंबानी जगत आहेत लक्झरी जीवन, कसं?

> गेल्या आठवड्यापासूनच सिंहगडावरील पर्यटकांची गर्दी वाढत आहे. त्यामुळे गर्दीच्या व्यवस्थापनासाठी रविवारी सकाळपासूनच बंदोबस्त वाढवला होता. गडावरील गर्दी वाढल्यामुळे दुपारी आलेल्या पर्यटकांना पायथ्यालाच टोलनाक्याजवळ पूर्वकल्पना देण्यास सुरुवात केली. घाटरस्त्यात पर्यटक अडकल्याचे सांगूनही अनेक उत्साही पर्यटक गडावर गेले. काही मंडळी गर्दीचा अंदाज घेऊन माघारी फिरली. आवाहन केल्यानंतर अनेक पर्यटकांनी आम्हाला सहकार्यही केले., - **बाळासाहेब जिवडे,** वनरक्षक, सिंहगड

### चारचाकींच्या रांगाच रांगा

»धुक्यात हरवलेला सिंहगड अनुभवण्यासाठी आणि भर पावसात गरमागरम कांदा भजी, पिठले भाकरी खाण्यासाठी पर्यटकांनी शनिवारीही गर्दी केली होती. मात्र, रविवारी गर्दीने उच्चांक गाठला. सकाळी सहापासूनच वर्दळ वाढत गेली. दुपारी बाराच्या दरम्यान गडावरील पार्किंग फुल्ल झाले होते. घाट रस्त्यावर चार किलोमीटरच्या पर्यटकांच्या गाड्यांच्या रांगा लागल्या होत्या. गाड्या वर जाणे शक्य नसल्याने वन विभागाचे कर्मचारी आणि संयुक्त वन व्यवस्थापन समितीच्या स्वयंसेवकांनी पर्यटकांना गाड्या घाट रस्त्यातच कडेला लावायला सांगितल्या. पायवाटेने गडावर गेलेल्या पर्यटकांची संख्याही मोठी होती. गडावर जाणाऱ्यांची गर्दी पाहून काही पर्यटक मागे फिरले. त्यांनी पानशेतच्या बाजूला मोर्चा वळवला.

### बेशिस्त पर्यटकांचा विळखा

»- सिंहगडाबरोबरच खडकवासला धरणाजवळील चौपाटी, पानशेत मार्गावरही रविवारी संध्याकाळपर्यंत पर्यटकांची वर्दळ होती. मुळशी आणि ताम्हिणी परिसरातही गेल्या आठवड्यात मुसळधार पाऊस पडल्याने धबधब्यांचा आनंद घेण्यासाठी पुणेकरांनी गर्दी केली होती. अनेक ठिकाणी घाट रस्त्यात बेशिस्त वाहनचालकांनी गाड्या लावल्याने वाहतुकीला अडथळा झाला. अखेर गावकऱ्यांनी रस्त्यावर उतरून कोंडी सोडवली.

---

# अजित पवारांच्या बॅनरवरून त्यांच्याच विठ्ठलाचा फोटो गायब...!

## »बारामतीत राजकारण खवळलं

। बा रामती। महाईन्यूज । प्रतिनिधी।

**राज्यात राजकारणात मोठी घडामोड घडली आहे. शिवसेनेनंतर आता राष्ट्रवादीमध्ये बंड झाले आहे. अजित पवारांनी शिंदे-फडणवीस सरकारसोबत हातमिळवणी करत उपमुख्यमंत्री पदाची शपथ घेतली आहे. यानंतर अजित पवारांच्या समर्थकांनी बारामतीत बॅनर लावले आहेत. मात्र या बॅनरमध्ये शरद पवारांचा फोटो नसल्याने चर्चांना उधाण आले आहे.**

: राज्याचे राजकारण अजित पवार यांच्या बंडानंतर ढवळून निघाले आहेत. मात्र, बारामतीत अजित पवार यांना कार्यकर्त्यांकडून प्रोत्साहन देताना पहायला मिळतं आहे. अजित पवार उपमुख्यमंत्री झाल्यानंतर बारामतीत अनेकांनी बॅनर लावले आहेत. "आमचा विठ्ठल, आमचा दादा" या आशयाचे बॅनर लावल्याने त्यांची चर्चा सुरू झाली आहे. मात्र त्या बॅनरवरून चक्क शरद पवार यांचा फोटो नसल्याने अजित पवार यांची नेमकी भूमिका काय याबाबत संभ्रम निर्माण झाला आहे.

अजित पवार यांनी राष्ट्रवादीतून बाहेर पडून बंड करत राष्ट्रवादीच्या अनेक नेत्यांसह मंत्री पदाची ही शपथही घेतली. त्यामुळे शरद पवार यांनी पुन्हा सक्रिय होत त्यांना शह देण्यासाठी तयारी सुरू केली आहे.




मात्र, या बॅनरबाजीमुळे अजित पवारांची पुन्हा एकदा चर्चा सुरू झाली आहे. अजित पवार यांच्या बंडानंतर शरद पवार यांनी स्व. यशवंतराव चव्हाण यांच्या स्मृतीस्थळी दाखल होत आपल्या पुढच्या रणानितीचे रणशिंग फुंकले आहे. मात्र, अजित पवार उपमुख्यमंत्री पदाच्या बॅनरवरून शरद पवार यांचा फोटो गायब झाला आहे. फक्त अजित पवार यांचाच फोटो बॅनरवर दिसत आहे. अजित पवार यांच्या विठ्ठलाचाच फोटो बॅनर वरून गायब झाल्याने चर्चांना उधाण आले आहे. मात्र उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी माझ्या निवडीचे बॅनर लावला तर शरद पवार साहेबांचा देखील फोटो लावावा असे आवाहन त्यांनी कार्यकर्त्यांना केले आहे.

# येरवड्यातील चौदा कर्मचाऱ्यांच्या बदल्या

। पुणे । महाईन्यूज ।



येरवडा कारागृहात सातत्याने मोबाइल सापडून येण्याच्या घटना घडत आहेत. या पार्श्वभूमीवर प्रशासनाने चौदा संशयित कर्मचाऱ्यांची अमरावती, कोल्हापूर, नागपूर, चंद्रपूर आणि सिंधुदुर्ग कारागृहांत बदली केली आहे.

गेल्या तीन ते चार महिन्यांपासून येरवडा कारागृहाच्या आवारात आणि कैद्यांच्या बराकीत सातत्याने मोबाइल सापडून येण्याच्या घटना वाढल्या आहेत. येरवडा पोलिसांकडून मोबाइल वापरणाऱ्या कैद्यांविरोधात गुन्हा दाखल केला जात आहे. प्रशासनाकडून अशा कैद्यांना मिळणाऱ्या सुविधांवर बंधने घातली जात आहेत; पण तरीही मोबाइल सापडून येण्याच्या घटना थांबलेल्या नाहीत. कारागृहातील काही कर्मचाऱ्यांच्या मदतीशिवाय आतमध्ये मोबाइल जाऊ शकत नाही, अशी शक्यता वरिष्ठ अधिकाऱ्यांकडून वर्तवली जात आहे. त्यामुळे कारागृहाच्या बाहेर कर्तव्य बजावणाऱ्या संशयित चौदा कर्मचाऱ्यांची इतर कारागृहांत बदली करण्यात आली आहे.

तसेच, मोबाइल बाळगणारे, भांडणे, मारामारी करणारे आणि टोळी चालविणाऱ्या एकूण २५ कैद्यांची येरवडा कारागृहातून इतर कारागृहांत रवानगी करण्यात आली आहे. याशिवाय आणखीन २५ कैद्यांना इतरत्र हलविण्यासाठी न्यायालयाला प्रस्ताव पाठविला आहे.

# कोणता झेंडा घेऊ हाती?

## राष्ट्रवादी कॉंग्रेसमधील पदाधिकारी व कार्यकर्त्यांची अवस्था

। पिंपरी । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**राष्ट्रवादी कॉंग्रेसचे नेते अजित पवार यांनी रविवारी (ता. २) बंड करून, उपमुख्यमंत्रिपदाची व अन्य ८ नेत्यांनी मंत्रिपदाची शपथ घेतली. त्यामुळे राष्ट्रीय अध्यक्ष शरद पवार की अजित पवार यापैकी कोणाचे नेतृत्व मान्य करायचे, याबाबत पिंपरी चिंचवड शहरातील पदाधिकारी व कार्यकर्त्यांमध्ये द्विधा मनःस्थिती निर्माण झाली आहे. त्यामुळे अनेक पदाधिकाऱ्यांनी व कार्यकर्त्यांनी कोठे जाणार याबाबत मौनच पाळले आहे.**





बारामतीतून १९९१ मध्ये अजित पवार यांनी प्रथम निवडणूक लढविली. त्यावेळी पिंपरी चिंचवड बारामती मतदारसंघात होते. पहिल्याच निवडणुकीत शहराने भरभरून प्रेम केले व निवडून दिले या भावनेने अजित पवार यांचा शहरावर विशेष जिव्हाळा आहे. त्यानुसार त्यांनी शहराचा कायापालट करण्यातही महत्त्वाची भूमिका बजावली.

हे शहर राज्यात विकासाचे 'मॉडेल' म्हणून समोर न्यायचे होते. त्यानुसार त्यांनी कामही केले. मात्र, २०१७ मध्ये शहराने महापालिका निवडणुकीत भाजपला स्वीकारले. कॉंग्रेसचे दिवंगत नेते प्रा. रामकृष्ण मोरे यांच्या निधनानंतर १४ वर्षे अजित पवार यांनी एक हाती महापालिकेत नेतृत्व केले.

या शहरात त्यांनी अनेकांना आमदार, महापौर, स्थायी समिती अध्यक्ष, उपमहापौर अशा विविध पदांवर विराजमान केले. त्यामुळे राष्ट्रवादीच्या पदाधिकारी व कार्यकर्त्यांपैकी ८० ते ८५ टक्के कार्यकर्ते अजित पवार यांना मानणारे आहेत. पुरोगामी विचारांच्या धारेत गेली अनेक वर्षे शरद पवार यांचे नेतृत्व मानून काम केलेलेही अनेकजण आहेत. अशा परिस्थितीत 'साहेबां'बरोबर जायचे की 'दादां'बरोबर याबाबत कार्यकर्त्यांमध्ये द्विधा मन:स्थिती झाल्याचे दिसून येत आहे. अनेकांनी 'वेट अँण्ड वॉच' अशी भूमिका घेतली आहे.

### महापालिकेतील 2017 चे संख्याबळ

| | |
|---|---|
| भाजप | - ७७ |
| राष्ट्रवादी कॉंग्रेस | - ३६ |
| शिवसेना | - ९ |
| अपक्ष | - ५ |
| मनसे | - १ |
| **एकूण** | - १२८ |

### महेश लांडगे यांचे वर्चस्व कमी होणार?

**महापालिकेत २०१७ मध्ये भाजपची एकहाती सत्ता आल्यानंतर सुरवातीला दिवंगत आमदार लक्ष्मण जगताप व आमदार महेश लांडगे यांचे पालिकेत वर्चस्व होते. आमदार जगताप यांच्या निधनानंतर आमदार लांडगे यांच्याकडे भाजपचे शहरातील नेतृत्व आले. लांडगे हे शहराध्यक्ष असल्याने त्यात आणखीनच भर पडली. पोटनिवडणुकीत अश्विनी जगताप भाजपच्या आमदार म्हणून निवडून आल्या आहेत. परंतु; त्या नवख्या असल्याने प्रशासनावर लांडगे यांचीच पकड आहे. आता अजित पवार भाजपबरोबर आल्याने ते शहरात लक्ष घालणार. त्यामुळे आपसूकच आमदार लांडगे यांचे वर्चस्व कमी होणार, अशी चर्चा आहे.**

# तीन लाख नागरिकांनी घेतला मिळकतकर सवलत योजनेचा लाभ

## 447 कोटी तीन लाख 65 हजार रुपयांचा कर महापालिकेच्या तिजोरीत

। पिंपरी । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**शहरात सहा लाख दोन हजार २०३ मिळकतधारक आहेत. त्यापैकी तीन लाख तीन हजार ३५० मिळकतधारकांनी गेल्या तीन महिन्यांत कर भरून ३० जूनपर्यंतच्या सवलत योजनेचा लाभ घेतला. त्यामुळे तब्बल ४४७ कोटी तीन लाख ६५ हजार रुपयांचा कर महापालिकेच्या तिजोरीत जमा झाला.**

मिळकतकर थकबाकी वसुलीसाठी महापालिकेने गेल्या आर्थिक वर्षात विविध उपक्रम राबवले. त्यात जनजागृती, जप्ती मोहीम, मालमत्ता धारकांना नोटीस, नळजोड बंद करणे, थकबाकीदारांची वृत्तपत्रात नावांची यादी प्रसिद्ध करणे आदींचा समावेश होता. शिवाय, यावर्षी महिला बचत गटांच्या माध्यमातून मिळकतकर बिलांचे घरपोच वाटप केले. रिक्षांद्वारे ध्वनिक्षेपकाच्या माध्यमातून जनजागृती केली. महत्त्वाच्या चौकांत होर्डिंग्ज लावले. रिल्स स्पर्धा घेतली. सोशल मीडियाचा प्रभावी वापर केला. प्रत्येक व्यक्तीला त्याची मालमत्ताकराची रक्कम आणि सवलतीची रक्कम सांगणारा एसएमएसद्वारे कळविले. त्यामुळे अवघ्या तीन महिन्यातच कराचा भरणा वाढला आहे.

### 30 जून 'विक्रमी दिवस'

नेहमी ३१ मार्च रोजी सर्वाधिक कराचा भरणा होत असतो. यंदा ३० जूनला सर्वच करसंकलन विभागीय कार्यालयांत मिळकतधारकांची गर्दी होती. ३० जूनला यापूर्वीचे सर्व विक्रम मोडले गेले. या एकाच दिवसात तब्बल १४ हजार ६२० मिळकतधारकांनी ३० कोटी ८५ लाख रुपयांचा भरणा केला. त्यात २१ कोटी रुपये ऑनलाइन भरणा आहे. दोन लाख ६८ हजार सहा निवासी मिळकतींचा कर आहे. २३ हजार ९१६ बिगर निवासी, सात हजार १३० मिश्र, दोन हजार २४६ औद्योगिक आणि दोन हजार १८ मोकळ्या जागांचा कर त्यांच्या मालकांनी भरला आहे.




### सर्वाधिक करभरणा

**कर संकलनासाठी शहरात १७ विभागीय कार्यालये आहेत. यामध्ये वाकड झोनमध्ये सर्वाधिक ३९ हजार ६००, सांगवीमध्ये ३४ हजार ६९४, चिंचवडमध्ये २९ हजार ३०३, थेरगावमध्ये २८ हजार ३६८ मिळकतधारकांनी करभरणा केला आहे. तर सर्वात कमी तळवडे कार्यालयांतर्गत चार हजार १३१ जणांनी कर भरला आहे.**

# पिंपरीत लवकरच वरिष्ठ स्तर दिवाणी न्यायालय

। पिंपरी । महाईन्यूज ।



शहरातील दाव्यांची संख्या, न्यायालयावरील ताण लक्षात घेत पिंपरीत वरिष्ठ स्तर दिवाणी न्यायालय सुरू करण्यास मंजुरी मिळाली आहे. पुढील महिन्यात याचे कामकाज सुरू होणार आहे. पिंपरी-चिंचवड ॲडव्होकेट्स बार असोसिएशनने जिल्हा न्यायालयाच्या माध्यमातून उच्च न्यायालयाकडे पाठपुरावा केला. त्यास यश आले आहे. वरिष्ठ स्तर दिवाणी न्यायालय सुरू होणार असल्याने जिल्हा सत्र न्यायालय देखील सुरू होण्याचा मार्ग मोकळा झाला आहे.

अध्यक्ष ॲड. नारायण रसाळ यांच्या मार्गदर्शनाखाली उपाध्यक्ष ॲड. जयश्री कुटे आणि कार्यकारिणीने मुंबई उच्च न्यायालयाचे न्यायमूर्ती तथा पुणे जिल्ह्याचे पालक न्यायमूर्ती रेवती मोहिते-डेरे यांची मुंबई उच्च न्यायालयात भेट घेतली. बार कांउन्सिल ऑफ महाराष्ट्र आणि गोवाचे सदस्य ॲड. हर्षद निंबाळकर, पिंपरी-चिंचवड ॲडव्होकेट्स बार असोसिएशनचे माजी अध्यक्ष ॲड. विलास कुटे, सचिव ॲड. गणेश शिंदे, सदस्य ॲड. स्वप्नील वाळुंज, ॲड. सौरभ जगताप, ॲड. नितीन पवार, ॲड. मंगेश खराबे, ॲड. सत्यम निंबाळकर आदी उपस्थित होते. पिंपरी न्यायालय नेहरूनगर येथे स्थलांतरित झाले आहे. येथील न्यायालयात अकरा न्यायालये चालविण्यासाठी सर्व सुविधा उपलब्ध करून देण्यात आल्या आहेत. मात्र, सद्यस्थितीत इथे पाच न्यायालयांचे काम सुरू आहे. त्यामुळे आणखी सहा न्यायालये सुरू करण्यासाठी पाठपुरावा केला जात आहे. प्रॉपर्टीच्या किमतीवरून दावा कुठल्या न्यायालयात चालणार हे ठरते. पाच लाखांपेक्षा अधिक किमतीचे दावे वरिष्ठ स्तर दिवाणी न्यायालयात चालतात.




# यात महाराष्ट्राचे काय भले?

**साऱ्या महाराष्ट्राच्या मनावर खोल ओरखडा उमटविणारा भीषण अपघात समृद्धी महामार्गावर झाल्यानंतर काही तासांच्या आतच राज्यात आधीच ठरलेले राजकीय ऑपरेशन रीतसर सुरू व्हावे; यातूनच महाराष्ट्रातील राजकारण, राजकीय पक्ष आणि नेते यांचे जनेतच्या सुखदु:खाशी किती जिव्हाळ्याचे नाते उरले आहे, याची कल्पना यावी. मात्र, सगळ्यांनाच नव्या समीकरणाची घाई झाली होती. अजित पवार तर नवे उपमुख्यमंत्री म्हणून शपथ घेताना राज्यपालांनी 'मी..' अशी सुरुवात करेपर्यंतही थांबायला तयार नव्हते.**



राष्ट्रवादी काँग्रेसचे विधिमंडळ नेते आणि राज्याचे विरोधी पक्ष नेते असणाऱ्या अजित पवार यांची नाराजी आजवर कधीही लपली नव्हती. त्यांना पक्षाचा नि:संदिग्ध ताबा हवा होता आणि शरद पवार तो मुलीच्या प्रेमापोटी द्यायला तयार नव्हते आणि नाहीत, ही या संघर्षातली मूळ मेख आहे. हा संघर्ष सुप्त स्वरुपात अनेक वर्ष चालू होता. तो अनेकदा विकोपाला गेला. शेवटी रविवारी त्याचा निर्णायक तुकडा पडला. शिवसेनेत वेगळ्या प्रकारे हेच झाले होते. फक्त पात्रे वेगळी होती. शरद पवार १९६७ मध्ये प्रथम काँग्रेसचे आमदार झाले. त्यांचे वडील गोविंदराव शेतकरी कामगार पक्षाचे हितचिंतक होते आणि मोठे बंधू वसंतराव तर त्या पक्षाचे धडाडीचे कार्यकर्तेच होते. मात्र, हा अगदी जुना अपवाद वगळता गेली सहा दशके पवार कुटुंब हे एकसंध, एका विचाराचे आणि प्रामुख्याने शरद पवार यांचे एकमुखी नेतृत्व मानणारे राहिले. या ऐक्याला प्रथमच जबरदस्त तडा गेला आहे. शरद पवार आणि अजित पवार यांच्या भूमिकेत भविष्यकाळात जुळल्या नाहीत; तर हा संघर्ष अनेक पातळीवर, अनेक अंगांनी पाझरत राहील. एका अर्थाने ती एका साम्राज्याची वाटणी असेल. 'पुन्हा पक्ष उभा करीन..' अशी जिद्द शरद पवारांनी बोलून दाखविली आहे. मात्र, सन १९८० मध्ये असे आव्हान पेलणे आणि तसेच आव्हान आज अंगावर घेणे, यात बराच फरक आहे. काळ पुढे जातो आणि अजितदादा म्हणाले तसे पुलाखालून पाणीही बरेच वाहून जाते.

सन २०१९ मध्ये विधानसभा निवडणुका झाल्यानंतर भारतीय जनता पक्षाचा दोनदा 'विश्वासघात' झाला. पहिला, उद्धव ठाकरे यांनी संसार मोडून केला आणि दुसरा, अजित पवार यांना 'पहाटेच्या शपथविधीला' पाठवून शरद पवार यांनी केला. 'गुगली' असे त्याचे वर्णन पवारांनी नुकतेच केले होते. या दोन्ही 'विश्वासघातां'चा राजकीय सूड भाजप आणि देवेंद्र फडणवीस यांनी आता पुरा केला आहे. खरे तर शिंदे-फडणवीस सरकार स्थिर आहे. एकनाथ शिंदे यांनी मूळ शिवसेनेचे घर जवळपास धुवून नेले आहे. तरीही, भाजपला 'राष्ट्रवादी'ची साथ हवीशी वाटावी आणि त्रिपक्षीय सरकार व्हावे, हे विरोधकांना पुरते हतबल करणारे आक्रमक राजकारण आहे. त्याचे खरे लक्ष्य सन २०२४ची लोकसभा निवडणूक आहे. विरोधकांच्या राष्ट्रीय ऐक्यात शरद पवार हे महत्त्वाची भूमिका बजावत होते. तिलाही हा जबर धक्का आहे. एकनाथ शिंदे यांच्या बंडाचे वर्षभर बरेच कौतुक झाले. आता त्याच वाटेने नवे मित्र आल्यावर या जुन्या कौतुकाला उतार पडेल. शिंदे यांनी मूळ पक्षाचे नाव, चिन्ह मिळवून पक्ष काबीज केला. याच खेळाचा हा दुसरा अंक आहे. आता नाव, घड्याळ हे चिन्ह यांच्यासाठी कज्जेदलाली होऊ शकते. मात्र, पक्षचिन्हासाठी न भांडण्याची शरद पवार यांची भूमिका प्रौढपणाची आहे. शिवाय, ती भूमिका भविष्यातल्या अनेक राजकीय शक्यताही मोकळ्या ठेवते.

रविवारी शपथ घेणाऱ्या अनेकांच्या डोक्यावर विविध केंद्रीय यंत्रणांच्या दृश्य किंवा अदृश्य तलवारी आहेत. पंतप्रधान मोदींनी परवा भोपाळमध्ये 'राष्ट्रवादी'वर ७० हजार कोटींच्या गैरव्यवहारांचा आरोप करताना फक्त 'शरद पवार आणि त्यांची मुलगी सुप्रिया' इतकाच घराणेशाहीचा उल्लेख केला होता. तो सूचक होता. रविवारी जे झाले; त्यात केवळ पवार, त्यांची मुलगी सुप्रिया सुळे आणि काही मोजके निष्ठावंत बाजूला राहिलेले दिसतात. आज जे मंत्री झाले; त्यातील काही तुरुंगात जाऊन आले आहेत. शिवाय, अनिल देशमुख आणि नवाब मलिक यांनाही तुरुंगवास झालाच. तेव्हा त्यांनाही भाजप घेणार की मोठ्या पवारांकडेच ठेवणार? ज्यांच्या चौकशा चालू आहेत; त्या चौकशांचे आता काय होणार? भाजपने गेल्या दशकभरात महाराष्ट्रासहित देशभर जी 'पतित पावन मंदिरे' उघडली आहेत; तिथे लोक स्वखुशीने जातात, मानेवरची टांगती तलवार दूर व्हावी म्हणून जातात की राष्ट्रकार्याची उबळ असह्य झाल्यामुळे जातात? रविवारच्या शपथविधीत सगळ्यांची देहबोली इतकी अवघडलेली, सावध होती की तीतूनच या नव्या आघाडीचे अनैसर्गिकपण अधोरेखित होत होते. एक चतुर मुख्यमंत्री आणि दोन प्रबळ उपमुख्यमंत्री असे सरकार महाराष्ट्र प्रथमच अनुभवणार आहे. महाविकास आघाडीत काँग्रेस हा गरीब बिचारा तिसरा, निष्प्रभ पक्ष होता. आता तो दैवगतीने पहिला झाला. विधानसभेतील विरोधी पक्षनेतेपद आता काँग्रेसकडे जायला हवे. या निमित्ताने एक वेगळा प्रश्न मांडायला हवा. तो म्हणजे, ताज्या घडामोडींनंतर राज्यातील राजकीय आणि सामाजिक वातावरणातील विषारीपणा, जातीयवाद थोडा कमी होणार आहे का? तसे झाले तर तो तेवढाच फायदा. मात्र, महाराष्ट्रातील जनतेचे मन आणि मत यांना आम्ही कवडीची किंमत देत नाही, हे सगळ्या राजकीय पक्षांनी मिळून पुन्हा एकदा सिद्ध केले आहे. सन २०१९ पासून अनेकांचे भले झाले. अनेकांचा कपाळमोक्ष झाला. रविवारी त्याच नाटकाचा पुढचा अंक झाला.

## संपादकीय »

### आपण सारे भाऊ-भाऊ!...

***केंद्राच्या धर्तीवर शेतकऱ्यांसाठी दरमहा सहा हजार रु. अनुदान, एक रुपयात पीक विमा आणि महाराष्ट्राच्या जवळपास १२ कोटी जनतेस पाच लाख रुपयांपर्यंतचे वैद्यकीय साहाय्य यांचा जमेच्या रकान्यात आवर्जून उल्लेख करावा लागेल.***

पहाटेच्या शपथविधीची पुनरावृत्ती 'अजितदादां'नी आता दुपारी केलेली. भलेही या चमत्कारिक खेळीत 'देवेंद्रपंत' अन् 'अजितदादा' यांची गणितं वेगळी असलेली; परंतु यामुळं जिल्ह्यातील सारीच समीकरणं भलतीच ढवळून निघालेली. कैक नेत्यांची स्वप्नं पार उद्ध्वस्त झालेली. आता पंढरपुरात 'पंतां'च्या वाड्यावर सत्यनारायणाचा प्रसाद घ्यायला 'अभिजितआबा' गेले, तर आश्चर्य वाटायला नको. माढा दौरा करतेवेळी 'रणजितदादां'नी 'संजयमामां'सोबत लंच घेतलं, तर वाईट वाटायला नको. सारंच अक्रित... अनाकलनीय... लगाव बत्ती... सोलापूर जिल्ह्यात 'कमळ'वाल्यांचे तब्बल सहा आमदार. तरीही साडेतीन वर्षांपासून पालकमंत्रिपदापासून वंचित. पुढच्या आठवड्यात होणाऱ्या विस्तारात दोन्ही देशमुखांपैकी एकाच्या नावाची गॅरंटेड खात्री. बाकीच्यांनाही थोडीफार आशा... पण कुठलं काय अन् कसलं काय.

**'जॅक ऑफ ऑल अँड मास्टर ऑफ वन' ही म्हण सगळ्यांच्या परिचयाची असेल. पण आजच्या अटीतटीच्या स्पर्धेत जॅक ऑफ ऑल अँड मास्टर ऑफ वनची गरज अधिक आहे, असे म्हणणे वावगे ठरणार नाही. सखोल ज्ञान असल्यामुळे वस्तुनिष्ठ विश्लेषण, योग्य नियोजन आणि उत्तम कामगिरी करण्याची शक्यता अजून वाढते. विषय, उद्योग, ग्राहकांचा कल याबाबत सखोल ज्ञान असल्यामुळे व्यावसायिक आणि वैयक्तिक पातळीवर भरभराट होण्यास मदत होतेच, पण त्याचबरोबर निष्काळजीपणा, तक्रारी, गैरजसमजदेखील कमी होण्यास मदत होते.**

## करिअरमधील 'मिक्स अँड मॅच'

एका विषयात पदवी शिक्षण घेतलेले दुसऱ्याच क्षेत्रात कार्यरत असल्याची अनेक उदाहरणे आहेत. जसे की, बीए (इतिहास), कम्प्युटर कोर्स केलेले एखाद्या कंपनीच्या एचआर विभागात कार्यरत आहेत किंवा प्राणीशास्त्रातील बीएससी पदवी आणि एखाद्या कंपनीच्या विपणन विभागात काम करतात. सध्या 'मिस अँड मॅच'चा ट्रेंड वाढताना दिसत आहे. पण या सगळ्यात एका महत्त्वाच्या प्रश्नाकडे आपले दुर्लक्ष होते आहे, तो म्हणजे नोकरीच्या क्षेत्राशी पूर्णपणे किंवा अंशतः संबंधित कोर्सचा अभ्यास करण्यास काय हरकत आहे? लक्षात घ्या, इथे मी जॉब-ओरिन्टेड कोर्सबाबत बोलत नसून अशा 'इंटर-रिलेटेड' किंवा 'कॉम्बिनेशन' कोर्सेसबाबत बोलत आहे. यामुळे स्पर्धात्मक काळात दुसऱ्यांपेक्षा एक पाऊल पुढे राहण्यास मदत होईल. असे हे 'इंटर-रिलेटेड' किंवा 'कॉम्बिनेशन' कोर्स करण्याचे विविध फायदे समजून घेऊ या...

केवळ पदवीवर उत्तम नोकरी मिळवण्याचा काळ राहिलेला नाही. लक्षात घ्या, सध्याची वाढती लोकसंख्या बघता आणि स्वतःचे वर्चस्व, अस्तित्व टिकवण्यासाठी बऱ्याच कंपन्यांनी हायर अँड फायर या धोरणाचा स्वीकार केलेला आहे. अशा परिस्थितीत एकाच क्षेत्रात पारंगत असलेल्या व्यक्तींपेक्षा बहु-प्रतिभावान व्यक्ती टिकून राहण्याची शक्यता अधिक आहे. उदाहरणार्थ, सध्या कम्प्युटरचे ज्ञान हे अतिरिक्त शैक्षणिक पात्रता म्हणून पाहिले जात नाही. पण कोणत्याही उद्योगात ती आवश्यक पात्रता आहे.



- कामाशी संबंधित नसलेल्या विषयाचा अभ्यास करण्यापेक्षा इंटर-रिलेटेड विषय/कोर्स नेहमीच फायदेशीर ठरतो.
- आधी नमूद केल्याप्रमाणे घेतलेले शिक्षण आणि त्या शिक्षणाचा संबंध नसलेल्या क्षेत्रात काम करण्यापेक्षा इंटर-रिलेटेड कोर्स हे यशस्वी कारकीर्द बनवण्याचा मार्ग नक्कीच सोपा करतात.
- एका विषयातील ज्ञानाचा उपयोग दुसऱ्या विषयाच्या पायाबांधणीसाठी होतो.

इंटर-रिलेटेड कोर्सचा अजून एक फायदा म्हणजे एका विषयातील ज्ञानाचा उपयोग दुसऱ्या विषयात करता येतो. जसे की, भाषेवरील प्रभुत्व (उदारणार्थ, मराठी भाषा) आणि पत्रकारितेचा अभ्यासक्रम एकमेकांना पूरक आहे. कारण भाषेचा पाया मजबूत असल्यामुळे पत्रकारितेच्या अभ्यासक्रमाशी जुळवून घेणे अधिक सोपे होते. अशा प्रकारे एका कोर्सचे ज्ञान दुसऱ्या कोर्सच्या कामकाजात सहजपणे लागू केले जाते.

## ।। अभंगवाणी ।।



अइकाल परी ऐसें नव्हे बाई ।
न संडा या सोई भ्रताराची ॥१॥
नव्हे आराणुक लौकिकापासून ।
आपुल्या आपण गोविलें तें ॥२॥

**- संत तुकाराम**

**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक संपादक अधिकराव दिवे- पाटील** यांनी विशाल थिएटर, पिंपरीच्या बाजूला **'महाईन्यूज'**च्या पुणे विभागीय कार्यालयामधून प्रकाशित केले आहे. या वृत्तपत्रात डिजिटल स्वरुपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक संपादक सहमत असतीलच असे नाही. **कार्यकारी संपादक : *वैष्णव जाधव.** (*सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील) एमएसएमई क्रमांक : MH-26-0158827.
(विशेष सूचना: हा अंक प्रिंटसाठी नाही. गैरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.)

## ठाकरेंची साथ सोडताना ज्यांचं नाव घेतलं ते मंत्रिमंडळात

# आमदार-मंत्र्यांमध्ये अस्वस्थता!

### राष्ट्रवादी काँग्रेसच्या सत्तेप्रवेशामुळे निर्माण झालेली नाराजी सेनेच्या आमदारांकडून व्यक्त

| ठाणे |

महाईन्यूज | प्रतिनिधी|

**राज्यात सत्तेच्या प्रयोगाच्या नाट्यमय घडामोडी घडत असताना सोमवारी सकाळी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या ठाण्यातील निवासस्थानी शिवसेनेचे मंत्री आणि आमदारांनी आपली अस्वस्थता जाहीर केली. राष्ट्रवादी काँग्रेसच्या सत्तेप्रवेशामुळे निर्माण झालेली नाराजी या आमदारांनी यावेळी मुख्यमंत्र्यांसमोर व्यक्त केली.**



अजित पवार सरकारमध्ये सामील होऊन उपमुख्यमंत्रिपदी विराजमान झाल्याने आता जुने वाद आणि मतभेदाचे काय, असा प्रश्न आमदारांनी उपस्थित केला. याबाबत उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याशी चर्चा करणार असल्याचे सांगत मुख्यमंत्री शिंदे यांनी उपस्थित मंत्री व आमदारांना आश्वस्त केले. त्यामुळे येत्या काळात या राजकीय कुरबुरींमधून मार्ग काढताना प्रत्येकाचाच कस लागणार आहे.

गुरुपौर्णिमेच्या निमित्ताने ठाण्यात टेंभीनाका येथील आनंदाश्रमात मुख्यमंत्री एकनाथ शिंदे हे शिवसेनेचे दिवंगत जिल्हाप्रमुख आनंद दिघे यांच्या प्रतिमेला वंदन करण्यासाठी दुपारी येणार होते. यावेळी काही पक्ष प्रवेशही होणार होते. तत्पूर्वीच शिवसेनेच्या काही मंत्री आणि आमदारांनी मुख्यमंत्री शिंदे यांचे ठाण्यातील खासगी निवासस्थान गाठले. याठिकाणी त्यांनी सध्याच्या राजकीय घडामोडींवर थेट नाराजी व्यक्त केली. राष्ट्रवादीचे आमदार सरकारमध्ये सामील झाल्याने आता जुने वाद पुन्हा होण्याची शक्यता आहे. यासोबतच रायगड, नाशिक, सातारा जिल्ह्यात शिवसेना आणि राष्ट्रवादीमध्ये नेत्यांचे तीव्र मतभेद आहेत. त्यामुळे भविष्यात पुन्हा वादाचा अंक रंगण्याची शक्यता असल्याचा सूर आमदारांनी आळवला. या बैठकीला मंत्री उदय सामंत, शंभूराज देसाई, गुलाबराव पाटील, संदीपान भूमरे, दादा भुसे, आमदार संजय शिरसाट, संजय बांगर, प्रकाश सुर्वे आदी उपस्थित होते.

#### ठाकरे गटाकडून जुने व्हिडिओ शेअर

»अजित पवार आणि राष्ट्रवादीचे नेते महायुतीमध्ये सहभागी झाल्यामुळे त्यांचे आणि आमचे पूर्वीचे धोरण बदलेल. त्यामुळे नवीन धोरण आणि सूत्राप्रमाणे सर्व पुढे जाऊ. सरकारमध्ये तिसरा मित्रपक्ष घेण्याचा निर्णय वरिष्ठांनी घेतला असून आम्ही त्याबद्दल बिलकुल नाराज नाही, असं ठाण्याचे पालकमंत्री शंभूराज देसाई यांनी म्हटलं.दरम्यान, राष्ट्रवादीच्या नेत्यांचं कारण देत बाहेर पडलेल्या सेना आमदारांना ठाकरे गटाकडून जुने व्हिडिओ शेअर करुन प्रश्न विचारले जात आहेत.

---

## अजित पवार गटाचा संपूर्ण पक्षावर दावा



|मुंबई|

आम्हीच मूळ पक्ष असल्याचा दावा करीत अजित पवार गटाने राष्ट्रवादीच्या प्रदेशाध्यक्षपदावरून जयंत पाटील यांची हकालपट्टी केली असून, सुनील तटकरे यांना नवे प्रदेशाध्यक्ष म्हणून नियुक्त केले आहे. जयंत पाटील यांची नियुक्ती आपल्या स्वाक्षरीने झाली होती. मी आता पक्षाचा कार्यकारी अध्यक्ष आहे, पूर्वी उपाध्यक्ष होतो तेव्हा ही नियुक्ती केली होती. संघटनात्मक निवडणुका झाल्या नव्हत्या. त्यामुळे तात्पुरती व्यवस्था म्हणून ही नियुक्ती केली होती.

आता मी जयंत पाटील यांना जबाबदारीतून मुक्त करीत असल्याचे अधिकृतरीत्या कळविले आहे. तसेच त्यांच्या जागेवर सुनील तटकरे यांना प्रदेशाध्यक्ष म्हणून नियुक्त करतो आहे, असे प्रफुल्ल पटेल यांनी जाहीर केले. अजित पवार, प्रफुल्ल पटेल, छगन भुजबळ, सुनील तटकरे यांची पत्रकार परिषद सोमवारी सह्याद्री अतिथीगृहात पार पडली. त्यावेळी पटेल यांनी ही घोषणा केली.

## अजून बऱ्याच विकेट काढायच्या आहेत!

### »एकनाथ शिंदे यांच्या विधानाने तर्कवितर्कांना ऊत

|ठाणे|

वृत्तसंस्था : महाईन्यूज

**मी मुख्यमंत्री असलो तरी तुमच्यातील एक आहे, त्यामुळे रस्त्यावर उतरून जनतेची कामे करीत आहे. मात्र, घरात बसून जनतेची कामे होत नाहीत, कोविड काळात तर आपले परके झाले होते, भेट देण्यासही तयार नव्हते, अशी टीका मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी उद्धव ठाकरे यांचे नाव न घेता केली. आता बऱ्याच जणांच्या विकेट अजून काढायच्या आहेत, असेही ते म्हणाले. त्यामुळे मुख्यमंत्र्यांचा रोख जुन्या विरोधकांकडे की नव्या स्पर्धकांकडे अशी चर्चा सुरू झाली आहे.**

गुरुपौर्णिमेनिमित्त ठाण्यातील आनंद आश्रमात शिंदे यांनी आपल्या आमदारांसह बाळासाहेब ठाकरे आणि आनंद दिघे यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून गुरुपौर्णिमा साजरी केली. तसेच यावेळी पक्ष प्रवेशाचा कार्यक्रम पार पडला, यावेळी ते बोलत होते. २०१९ मध्ये युतीचेच सरकार येणार होते. मात्र, काहींना सत्तेचा आणि खुर्चीचा मोह आवरला नाही, त्यामुळे ते सरकार येऊ शकले नाही. घरात किंवा कार्यालयात बसून जनतेची कामे होत नाहीत. आता खऱ्या अर्थाने युतीचे सरकार आले असून लोकहिताची कामे केली जात आहेत. आपल्या सर्वांना एकत्र येऊन काम करायचे आहे. कलाकारांनी कलाकारांसाठी कामे केले पाहिजे. यात कोणत्याही प्रकारचे राजकारण करू नका, अशी सूचना त्यांनी केली.



राज्याच्या मंत्रिमंडळात अजून १३ जागा भरायच्या आहेत. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे व उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस लवकरच मंत्रिमंडळ विस्ताराबाबत निर्णय घेतील, अशी माहिती उत्पादन शुल्कमंत्री व ठाणे जिल्ह्याचे पालकमंत्री शंभूराज देसाई यांनी दिली. राष्ट्रवादी मंत्र्यांच्या शपथविधीमुळे शिवसेना आमदारांमध्ये नाराजी नसल्याचा दावा देसाई यांनी केला. शिंदे गटाचे प्रवक्ते संजय शिरसाट यांनी आठ दिवसांत विस्तार होईल, असे आनंदाश्रम येथे पत्रकारांना सांगितले. येत्या ९ जुलै रोजी मंत्रिमंडळाचा विस्तार होणार असून, त्यात शिंदे गटाला पाच तर भाजपला आठ मंत्रिपदे प्राप्त होतील, असे समजते. अजित पवार यांच्या रूपाने लवकरच नवीन मुख्यमंत्री मिळणार असल्याच्या खासदार संजय राऊत यांच्या वक्तव्यावर मंत्री देसाई म्हणाले, हा पोपट गेले वर्षभर चुकीची चिठ्ठी काढतो.

# अजित पवारांचा सत्ताप्रवेश अन् भाजपाचे हतबल कार्यकर्ते!



## भूमिका

-सचिन चपळगावकर
ज्येष्ठ पत्रकार

**साऱ्या राज्यात सत्तांतराचे नाट्य घडवून 'महाचाणक्य' झालेले उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस भाजपा आणि संघ परिवारासह महाराष्ट्रातील भाजपा समर्थक मतदारांच्या टीकेचे धनी बनले आहेत. राष्ट्रवादीचे नेते अजित पवार यांना सोबत घेऊन स्थापन केलेले सरकार म्हणजे पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि भाजपाची विश्वासार्हता गमावलेली आहे.**

"भट-बामणांचा पक्ष" म्हणून ज्यांनी आतापर्यंत भाजपाला हिनवले. त्यांच्या मांडीला मांडी लावून भाजपाच्या कट्टर कार्यकर्त्यांना बसावे लागेल. हे निष्ठावंत भाजपायींना रुचणारे नाही. भाजपा आणि संघ परिवार भाजपा+राष्ट्रवादी या नव्या तडजोडीला कदापि स्वीकारणार नाही. २०१९ मध्ये भारतीय जनता पार्टीच्या तिकीटावर १०५ आमदार निवडून आले. प्रत्येकाने राष्ट्रवादी-कॉंग्रेसशी दोन घात केले. संघर्ष केला. पण, त्यानंतरच्या काळात कॉंग्रेस-राष्ट्रवादी आणि शिवसेना असे महाविकास आघाडीचे सरकार आहे. या सरकारच्या काळात भाजपाच्या आमदारांना मतदार संघातील कामे मार्गी लावताना विरोधी पक्षात असल्याने अनेक अडचणींचा सामना करावा लागला, ही वस्तुस्थिती आहे.

पण, आता भाजपानेच राष्ट्रवादीशी हातमिळवणी केली. गेल्या वर्षभरापासून मंत्री पदाची



स्वप्ने पडणाऱ्या शिवसेना आणि भाजप आमदारांचा केंद्रीय नेतृत्व आणि उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या 'चाणक्यनिती'मुळे स्वप्नभंग झाला. राष्ट्रवादी आणि कॉंग्रेसला त्या-त्या मतदार संघात आव्हाने देणारे भाजपाचे आमदार घायाळ झाले. किंबहुना, भाजपाला मानणारा मतदार आणि कट्टर समर्थकांकडून देवेंद्र फडणवीस यांच्यावर टीका होवू लागली आहे. मोदी आणि भाजपाची विश्वासाहर्ता फडणवीसांच्या सुडाच्या राजकारणामुळे धोक्यात आली असून, आगामी लोकसभा आणि विधानसभा निवडणुकीत भाजपाच्या कामगिरीवर दुष्परिणाम होणार, असे चित्र निर्माण झाले आहे.

स्थानिक नेत्यांमध्ये कमालीची अस्वस्थता... पिंपरी-चिंचवड शहरातील स्थानिक राजकारणाचा विचार करता मावळ लोकसभा मतदार संघातून शिवसेना (शिंदे गट) श्रीरंग बारणे यांनी २०१९ मध्ये राष्ट्रवादीचे नेते अजित पवार यांचे पूत्र पार्थ पवार यांचा पराभव केला. राष्ट्रवादी विरुद्ध बारणे हा संघर्ष राज्यभरात चर्चेत होता. चिंचवड विधानसभा मतदार संघात स्व. आमदार लक्ष्मण जगताप, भोसरी विधानसभा मतदार संघातून आमदार महेश लांडगे यांनीही बलाढ्य राष्ट्रवादीशी दोनहात केले आणि भाजपाच्या सत्तेचे शिलेदार बनले. मावळ विधानसभा मतदार संघात माजी मंत्री बाळा भेगडे यांनी राष्ट्रवादीचे आमदार सुनील शेळके यांच्याशी संघर्ष केला.

चिंचवड विधानसभा पोटनिवडणुकीत विद्यमान आमदार अश्विनी जगताप, राष्ट्रवादीचे नाना काटे आणि अपक्ष उमेदवार राहुल कलाटे अशी लढत झाली. काटे आणि कलाटे दोघांनी भाजपाला आव्हान दिले. आता आगामी काळात शहरातील भाजपा, राष्ट्रवादी, शिवसेना अशा तीनही प्रमुख पक्षांच्या विरोधकांना एकाच व्यासपीठावर बसावे लागणार आहे. अजित पवार यांच्या भाजपासोबतच्या युतीमुळे आतापर्यंत राष्ट्रवादीसोबत संघर्ष केलेल्या खासदार श्रीरंग बारणे आणि महेश लांडगे यांचेही राजकीय करिअर 'स्पॉईल' झाले आहे.

# मित्र बनला दुश्मन!

## वॅगनर ग्रुपची मॉस्कोकडे आगेकूच, पुतिन यांची खुर्ची धोक्यात, रशिया सत्तापालटाच्या दिशेने?

। वृत्तसंस्था ।
महाईन्यूज । प्रतिनिधी।

**रारशियातील वॅगनर ग्रुपनं अध्यक्ष पुतिन यांच्या विरोधात आक्रमक भूमिका घेतली आहे. वॅगनर ग्रुपचं सैन्य मॉस्कोच्या दिशेनं रवाना झाले आहे.**

रशियातील येवगेनी प्रिगोझिन यांनी अध्यक्ष व्लादिमीर पुतिन यांची सत्ता उलथवून टाकण्याची शपथ घेतली आहे. येवगेनी प्रिगोझिन हे वॅगनर ग्रुपचे प्रमुख आहेत. वॅगनर ग्रुप हा तैनाती फौजे प्रमाणे काम करतो. वॅगनर ग्रुपनं रशियातील सैन्याचं मुख्यालय असलेल्या रोस्तेववर ताबा घेतल्याची माहिती मिळत आहे. यामुळं रोस्तोवमधील कार्यक्रम रद्द केली जाते.

एकेकाळी पुतिन यांनी येवगेनी प्रिगोझिन यांना वॅगनर ग्रुपच्या स्थापपनेसाठी सहकार्य केलं होतं. आता तोच वॅगनर ग्रुप पुतिन यांच्या विरोधात उभा ठाकला आहे. वॅगनर ग्रुपच्या फौजा मॉस्कोच्या दिशेनं आगेकूच करत आहेत. यामुळं मॉस्कोमध्ये सैन्य वाढवण्यात आलं आहे. क्रेमलिन आणि ड्यूमाच्या सुरक्षेसाठी टॅंक आणि शस्त्रसज्ज गाड्या तैनात करण्यात आल्या आहेत. रशियाच्या स्पेशल फोर्सचे कमांडो तैनात करण्यात आले आहेत. रोस्तोवमध्ये रशियन सैन्य आणि वॅगनर ग्रुपमध्ये लढाई सुरु आहे. वॅगनर ग्रुप पुतिन यांच्या विरोधात आक्रमक का झाला असा सवाल उपस्थित केला जात आहे.

### हल्ला झाल्यानं वॅगनर ग्रुप आक्रमक

येवगेनी प्रिगोझिन यांनी रशियन सैन्यानं वॅगनर ट्रेनिंग कॅम्पवर क्षेपणास्त्र हल्ला केला. याासाठी क्रेमलिन जबाबदार असल्याचा दावा त्यांनी केला. प्रिगोझिन यांनी पुतिन यांना त्याचं उत्तर देण्याची शपथ घेतली आहे. आम्ही त्यांच्या सैन्यासह, विमान



आणि विरोधाला नष्ट करु असं ते म्हणाले आहे. आमचे २५ हजार लोक असून देशात इतकी अराजकता का आहे, असा प्रश्न उपस्थित केला. प्रिगोझिननं यानंतर रशियन सैन्याच्या नेतृत्त्वावर टीका केली. वॅगनर ग्रुपची मॉस्कोकडे सुरु असलेली आगेकूच योग्य असल्याचं प्रिगोझिन म्हणाले.

### जुना संघर्ष

रशियन सैन्य आणि वॅगनर ग्रुपमध्ये दीर्घकाळापासून तणावाचं वातावरण आहे. रशियन सैन्य वॅगनर ग्रुपचं विलीनीकरण करण्याचा प्रयत्न करत आहे. प्रिगोझिन यांनी त्याचा विरोध केला आहे. याशिवाय रशियन सैन्यानं शस्त्र पुरवठा न केल्याचा आरोप देखील वॅगनर ग्रुपनं केला आहे. त्यामुळं यूक्रेनमधील लढाईत नुकसान झाल्याच ते म्हणाले. शस्त्र न मिळाल्यानं वॅगनरच्या सैन्याच्या मृत्यूला रशियन सैन्य जबाबदार आहे, असा आरोप प्रिगोझिन यांनी केला. क्षेपणास्त्र हल्ल्यानं तणाव वाढला आहे.

### प्रिगोझिन यांच्यावर देशद्रोहाचा गुन्हा

रशियाची गुप्तचर यंत्रणा एफएसबीनं प्रिगोझिन यांच्या विरोधात चौकशी सुरु केली आहे. प्रिगोझिन यांच्या विरोधात सशस्त्र बंड करण्याचा आरोप करण्यात आला आहे. प्रिगोझिन यांचं वक्तव्य रशियाच्या संघराज्यीय क्षेत्रात सशस्त्र नागरी संघर्षाची सुरुवात असल्याचा आरोप करण्यात आला आहे. फॅसिझमचे समर्थक यूक्रेन विरुद्ध लढणाऱ्या सैन्याच्या पाठीत खंजीर खुपण्याचं काम करत असल्याचा देखील आरोप करण्यात आला. एफएसबीनं वॅगनर ग्रुपचे प्रमुख प्रिगोझिन यांना अटक करण्याचे आदेश देण्यात आले आहेत. वॅगनर ग्रुपनं रशियन सैन्या विरोधात लढा पुकारला आहे.

### वॅगनर ग्रुप रोस्तोवमध्ये

रशियन सैन्याचं मुख्यालय रोस्तोवमध्ये आहे. वॅगनर ग्रुप तिथपर्यंत पोहोचल्याची माहिती आहे. काही वृत्तांनुसार रोस्तोवमधील सैन्याच्या मुख्यालयावर वॅगनर ग्रुपनं ताबा घेतला आहे. रशियन सैन्याचं एक हेलिकॉप्टर देखील पाडण्यात आलं आहे.

# 'कुंडली भाग्य' फेम श्रद्धाचा टॉवेल डान्स व्हायरल!

हिंदी टीव्ही मनोरंजन विश्वातील 'कुंडली भाग्य' ही एक लोकप्रिय मालिका आहे. यामालिकेतील प्रिताची भुमिका प्रेक्षकांना खुप आवडते. टीव्हीवर सुसंस्कृत सुनेची भुमिका करणारी श्रद्धा आर्या ही तिच्या खऱ्या आयुष्यात खूपच बोल्ड आहे. श्रद्धा सोशल मिडियावर सक्रिय आहे. ती नेहमीच तिचे ग्लॅमरस फोटो आणि व्हिडिओ सोशल मिडियावर शेअर करत असते. तिचा चाहता वर्गही चांगला आहे.

नुकतचं श्रद्धाने तिच्या इंस्टाग्रामवर एक व्हिडिओ शेअर केला आहे, जो पाहून तिच्या चाहत्यांनाही धक्का बसला आहे. या व्हिडिओमध्ये ती टॉवेल घालून नाचताना दिसत आहे. श्रद्धाचा हा व्हिडिओ सध्या सोशल मीडियावर व्हायरल होत असून नेटकरी या व्हिडिओला प्रतिक्रिया देत आहेत.

श्रद्धाचा व्हायरल होत असलेला व्हिडिओ तिने स्वतः त्याच्या इंस्टाग्राम हँडलवर शेअर केला आहे. व्हायरल व्हिडिओमध्ये श्रद्धा तिच्या रुममध्ये ऑफिसला जाण्यासाठी तयार होताना दिसत आहे. यात तिने टॉवेल डान्स करत ती तयारी करत आहेत. मात्र, तयारीसोबतच ती मस्तीच्याही मूडमध्ये आहे. तयार होण्यापासून ते क्रीम लावण्यापर्यंतची सगळी काम तिने या व्हिडिओत दाखवली आहे.



# अभिनेत्री आता होणार निर्माती..
## शर्मिष्ठा राऊतने सुरु केलं स्वत:चं प्रॉडक्शन हाऊस

मराठी मनोरंजन सृष्टीतली एक हरहुन्नरी अभिनेत्री म्हणजे शर्मिष्ठा राऊत. शर्मिष्ठा राऊत मराठी मनोरंजन क्षेत्रात गेली अनेक वर्ष कार्यरत आहे. सध्या शर्मिष्ठा अबोली मालिकेत झळकत आहे. गेली अनेक वर्ष अभिनेत्री असलेली शर्मिष्ठा राऊत आता निर्माती होणार आहे. शर्मिष्ठाने स्वतःच्या प्रॉडक्शन हाऊसची घोषणा केली आहे. त्यामुळे आता शर्मिष्ठा राऊत निर्माती होणार आहे.

अभिनेत्री म्हणून शर्मिष्ठाची ओळख आणि चर्चा सगळीकडे असते. शर्मिष्ठाने आता निर्मिती संस्थेची घोषणा केल्याने ती पुन्हा एकदा चर्चेत आली आहे. शर्मिष्ठाच्या प्रॉडक्शन हाऊसचं नाव अजून ठरलं नाहीये. पण या प्रॉडक्शन हाऊसच्या माध्यमातून शर्मिष्ठा दर्जेदार मराठी मालिकांची निर्मिती करणार आहे. शर्मिष्ठाचा नवरा तेजस देसाई सुद्धा बायकोच्या या प्रॉडक्शन हाऊससाठी तिला खंबीर साथ देणार आहे.

शर्मिष्ठा राऊतला आपण जुळून येति रेशीमगाठी, सुखांच्या सरींनी हे मन बावरे, उंच माझा झोका अशा मालिकांमध्ये पाहिलंय. शर्मिष्ठा बिग बॉस मराठी २ मध्ये सुद्धा सहभागी होती. शर्मिष्ठाने तेजस देसाई सोबत अरेंज मॅरेज केलं. शर्मिष्ठा आणि तेजसची लव्हस्टोरी फार इंटरेस्टिंग आहे. शर्मिष्ठा लोकप्रियता अभिनेत्री असूनही तिचं स्थळ आल्यावर तेजसला शर्मिष्ठा राऊत कोण हे माहित नव्हतं.

त्यानं तिचं कामही पाहिलं नव्हतं, पण पहिल्याच भेटीत तेजस शर्मिष्ठाच्या प्रेमात पडला आणि तसं त्यानं तिला सांगितलंही. पण त्यावेळी शर्मिष्ठानं विचार करण्यासाठी काही दिवसांचा वेळ मागितला. कालांतरानं तिलाही तेजस आवडू लागला. या व्यक्तीबरोबर आपलं संपूर्ण आयुष्य आपण सुखात घालवू शकतो, हे जाणवल्यानंतर शर्मिष्ठानं तेजसला होकार दिला.



# कंगनाने 'चंद्रमुखी 2' च्या क्लायमॅक्स गाण्यासाठी रिहर्सल केली सुरु



अभिनेत्री कंगना रणौतने एक अपडेट शेअर केला आहे ज्यामध्ये तिने म्हटले आहे की चंद्रमुखी 2 चित्रपटाच्या क्लायमॅक्स गाण्यासाठी रिहर्सल सुरू झाली आहे. राघव लॉरेन्स या चित्रपटात मुख्य अभिनेता आहे. कंगनाने तिच्या ट्विटर हँडलवर चित्रपटाविषयी अपडेट दिले आहे.

तिने उल्लेख केला, 'कला मास्टरजींसोबत चंद्रमुखी 2 च्या क्लायमॅक्स गाण्याची रिहर्सल सुरू केली. हे गाणे गोल्डन ग्लोब विजेते श्री एम एम कीरावानी जी यांनी संगीतबद्ध केले आहे. महान श्री पी. वासू जी यांनी दिग्दर्शित केले'.

चंद्रमुखी 2 चे दिग्दर्शन पी. वासू यांनी केले आहे. 2005 मध्ये सुपरस्टार रजनीकांत आणि ज्योतिका सरवणन यांच्या प्रमुख भूमिका असलेल्या या चित्रपटाचा प्रीक्वेल रिलीज झाला होता. चंद्रमुखी हा मल्याळम चित्रपट मणिचित्रथाझूचा रीमेक आहे आणि अक्षय कुमार-स्टारर भूल भुलैया म्हणून हिंदीमध्ये रूपांतरित झाला.

# फ्लॉप सिनेमांमुळे वैतागला होता शाहरुख..
## बॉलीवूड सोडून करणार होता हा व्यवसाय

जगभरात पठाणचा धुमाकूळ सुरू आहे. पाचशे करोडचा टप्पा ओलांडत किंग खानच्या पठाणनं आता १००० कोटी करण्याकडे आपली घोडदौड सुरू केली आहे. तब्बल ४ वर्षांनी मोठ्या पडद्यावर झळकलेल्या शाहरुखनं वयाच्या ५७ व्या वर्षातही चाहत्यांना वेड करायची ताकद आजही आपल्यात आहे हे दाखवून दिलंय. पुन्हा एकदा बॉलीवूडमध्ये बादशहा एकच हे सिद्ध झालं आहे.

आज पठाणचं यश आपल्या चाहत्यांसोबत शेअर करण्यासाठी..त्यांचे मनापासून आभार व्यक्त करण्यासाठी शाहरुख खाननं एक पत्रकार परिषद घेतली होती. शाहरुखसोत जॉन अब्राहम आणि दीपिका पदूकोण सोबत पठाणची संपूर्ण टीम हजर होती. यावेळी शाहरुखनं आपण बॉलीवूड सोडणार होतो...असा धक्कादायक खुलासा केल्यानं सगळेच हैराण झाले आहेत. नेमकं काय म्हणालाय किंग खान याविषयी..चला जाणून घेऊया.



शाहरुख खानने पठाण निमित्त पत्रकार परिषद घेतली आहे. यावेळी शाहरुख खान मनातलं बोलला. शाहरुख म्हणाला,"माझा याआधीचा सिनेमा फ्लॉप झालेला. गेली ४ वर्ष खूप वेगळ्या अवस्थेत गेलेली. मी वैतागलो होतो. एकावेळी मी इंडस्ट्री सोडण्याचा विचार करतो. मी या काळात जेवण बनवायला शिकलो. मी फूड बिझनेस करण्याच्या विचारात होतो. त्याचं नाव ठेवणार होतो शाहरुख म्हणाला.

# विजयानंतरही ऑस्ट्रेलियाला धक्का!

## » मॅचविनर खेळाडू संपूर्ण मालिकेतून आऊट

महाईन्यूज । वृत्तसंस्था ।

**भारतीय ऑस्ट्रेलियाने दुसरा सामना जिंकला असला तरी त्यानंतर त्यांना आता एक मोठा धक्का बसला आहे. कारण आता संघातील मॅचविनर खेळाडूला दुखापत झाली असून तो आता पुढच्या तिन्ही सामन्यांत खेळणार नाही.**



ऑस्ट्रेलियाने इंग्लंडविरुद्धच्या दुसऱ्या कसोटी सामन्यातही विजय मिळवला. या विजयासह त्यांनी ASHES मालिकेत २-० अशी आघाडी घेतली आहे. पण या विजयानंतर ऑस्ट्रेलियाला एक मोठा धक्का बसला आहे. कारण आता ऑस्ट्रेलियाचा मॅचविनर खेळाडू यावेळी संपूर्ण मालिकेत खेळणार नसल्याचे आता स्पष्ट झाले आहे. त्यामुळे यापुढील तिन्ही कसोटी सामन्यांमध्ये या मॅचविनर खेळाडूच्या जागी कोणाला संधी द्यायची, याची चिंता आता ऑस्ट्रेलियाच्या संघाला आहे.

ऑस्ट्रेलियाचा फिरकी गोलंदाज नॅथन लायन संपूर्ण ॲशेस मालिकेला मुकणार आहे. दुसऱ्या कसोटीच्या दुसऱ्या दिवशी क्षेत्ररक्षण करताना त्याला दुखापत झाली होती. त्याच्या पोटरीला दुखापत झाली आहे. यातून सावरण्यासाठी त्याला वेळ लागणार आहे. त्याच्या जागी टॉड मर्फीला तिसऱ्या कसोटीत स्थान मिळण्याची शक्यता आहे. कारण, 'क्रिकेट ऑस्ट्रेलिया'ने लायनच्या जागी कोणाच्याही नावाची घोषणा केलेली नाही. तिसरी कसोटी गुरुवारपासून हेडिंग्ले येथे खेळली जाणार आहे.

### दुसऱ्या सामन्यात झालेल्या वादाची जोरदार चर्चा...

ॲशेस मालिकेतील दुसऱ्या लॉर्ड्स कसोटीत यजमान इंग्लंडला ऑस्ट्रेलियाकडून पराभव पत्करावा लागला. मात्र, या पराभवापेक्षा इंग्लंडचा फलंदाज जॉनी बेअरस्टोला ऑस्ट्रेलियाचा यष्टिरक्षक ॲलेक्स कॅरीने अखिलाडूवृत्तीने यष्टिचीत केल्याने चर्चेला तोंड फुटले आहे. फक्त आजी, माजी खेळाडू किंवा विश्लेषकच नव्हेत तर इंग्लंड आणि ऑस्ट्रेलियाच्या प्रशिक्षकांनीही उघड नाराजी व्यक्त केली.

### प्रशिक्षक मॅकलम म्हणाले...

»'आता ऑस्ट्रेलियाच्या खेळाडूंसोबत मैत्रीचे संबंध नसतील. वाढत्या वयासह माणसे अधिक प्रगल्भ होत जातात. तेव्हा तुम्हाला खेळ अधिक चांगल्या प्रकारे कळतो. काही निर्णय खेळ आणि खेळाडूच्या प्रतिमेवर परिणाम करतात. नियमानुसार बेअरस्टो बाद असेलही; पण तो काही धाव काढण्याचा प्रयत्न करीत नव्हता. अशा वेळी तुम्ही खिलाडूवृत्ती दाखवायलाच हवी. यामुळे कसोटीतील दर्जेदार खेळ आणि निकालापेक्षा चुकीच्या पद्धतीने यष्टिचीत केल्याची चर्चा अधिक होईल', असे इंग्लंडचे प्रशिक्षक मॅकलम म्हणाले.

---

# भारत-पाकिस्तान लढतीत 'क्वालिटी' राहिलेली नाही!

## » सौरव गांगुलीचं अचंबित करणारं विधान

।मुंबई।

महाईन्यूज । वृत्तसंस्था ।

वर्ल्ड कप २०२३ चे वेळापत्रक नुकतेच जाहीर झाले आहे. भारतीय संघ आपल्या वर्ल्ड कप मोहिमेची सुरुवात ऑस्ट्रेलियाविरुद्धच्या सामन्याने करणार आहे. भारत-ऑस्ट्रेलिया सामना ८ ऑक्टोबर रोजी चेन्नई येथे होणार आहे, तर भारत आणि पाकिस्तानचे संघ १५ ऑक्टोबरला अहमदाबादच्या नरेंद्र मोदी स्टेडियमवर आमनेसामने येतील. मात्र, भारत-पाकिस्तान सामन्यावर भारताचा माजी कर्णधार सौरव गांगुलीने मोठे वक्तव्य केले आहे. गांगुलीच्या मते, भारत-ऑस्ट्रेलिया सामना भारत-पाकिस्तान सामन्यापेक्षा चांगला आहे.





सौरव गांगुली म्हणतो की, गेली अनेक वर्ष भारत-पाकिस्तान सामना एकतर्फी होत असल्याचे जाणवत आहे. भारताने या सामन्यांमध्ये पाकिस्तानचा पराभव केला आहे. भारत-पाकिस्तान सामन्यासाठी लोकांमध्ये प्रचंड उत्साह आहे, मात्र गेल्या अनेक वर्षांत दर्जेदार सामने झालेले नाहीत. भारतीय संघ पाकिस्तानवर वर्चस्व गाजवत आहे. गेल्या वर्षी ट्वेंटी-२० वर्ल्ड कप स्पर्धेत भारत आणि पाकिस्तान आमनेसामने आले होते. उभय संघांमधील सामना शेवटच्या चेंडूपर्यंत गेला, ज्यामध्ये टीम इंडियाने पाकिस्तानचा ४ गडी राखून पराभव केला.

सौरव गांगुलीने २०२१च्या ट्वेंटी-२० वर्ल्ड कपची आठवण करताना म्हटले की, या स्पर्धेत बाबर आझमच्या नेतृत्वाखालील पाकिस्तानी संघाने भारताचा १० गडी राखून पराभव केला होता. तेव्हा भारतीय संघ खरंच वाईट खेळला होता. २०२३ च्या वर्ल्ड कप स्पर्धेत भारत आणि ऑस्ट्रेलिया यांच्यातला सामना दर्जेदार होईल.

# भारताच्या गोलंदाजीत दम नाही, वर्ल्ड कप आम्हीच जिंकणार!

## » पाकिस्तानी खेळाडूला दिवसा पडू लागले स्वप्न

। रियाध ।

महाईन्यूज । वृत्तसंस्था ।

**भारत-पाकिस्तान सामन्याची सर्वांनाच उत्सुकता आहे. या दोन्ही संघांच्या चाहत्यांमध्ये शाब्दिक युद्ध सुरू झाले आहे. पाकिस्तानचे माजी क्रिकेटपटूही सुसाट सुटत आहेत. १५ ऑक्टोबरला अहमदाबादच्या नरेंद्र मोदी स्टेडियमवर IND VS PAK सामना रंगणार आहे. पाकिस्तानचा माजी ऑफ स्पिनर सईद अजमल ( SAEED AJMAL) याने पाकिस्तान भारताविरुद्धच्या सामन्यात विजयाचा दावेदार असल्याचे म्हटले आहे. पाकिस्तानला आव्हान देऊ शकणारी गोलंदाजी भारताकडे नाही, असेही तो म्हणाला.**



भारतात ऑक्टोबर-नोव्हेंबर महिन्यात वन डे वर्ल्ड कप स्पर्धा होणार आहे. ICC ने नुकतेच वेळापत्रक जाहीर केले,

पॉडकास्टमध्ये अजमलने भारतीय गोलंदाजीची खिल्ली उडवली आणि म्हटले की भारतीय संघाची गोलंदाजी पाकिस्तानसारखी मारक कधीच नव्हती. भारताची गोलंदाजी नेहमीच कमकुवत राहिली आहे. तो म्हणाला की, मोहम्मद सिराजने अलीकडच्या काळात चांगली गोलंदाजी केली आहे. मोहम्मद शमीही चांगली गोलंदाजी करत आहे. रवींद्र जडेजा महत्त्वाचा ठरू शकतो, असे मला वाटते. जसप्रीत बुमराह पाकिस्तानसाठी आव्हानात्मक ठरू शकला असता, परंतु तो बराच काळ अनफिट आहे. मला वाटत नाही की भारतीय गोलंदाजी आमच्यासाठी धोकादायक आहे.